प्रकरण चौथे

` सांजवात ` - सामाजिक जीवन --

## प्रकरण चौथे

### `सांजवात ` मधून आढळणारे सामाजिक जीवन --

कोणतीही कलाकृती विचारात घेत असताना त्या साहित्य कृतीचा केवळ कलात्मक दृष्टीकोणातून विचार होऊ शकत नाही. वेलेक आणि वॉरेन यानी त्यांच्या ` साहित्य सिध्दांत ` ( अनुवादक डॉ.स.ग.मालशे ) यांनी या ग्रंथात म्हटले आहे ` साहित्य ही एक सामाजिक संस्था आहे व समाज निर्मित भाषा हे तिचे माध्यम आहे. कारण त्यांच्यामते ` साहित्याभ्यासातून उपस्थित होणारे बहुसंख्य प्रश्न निदान अंतिमत: गर्भितपणे तरी सामाजिक प्रश्न असतात ` तसेच लेखकावरही समाजाचा प्रभाव पडतो, तसाच लेखकाचाही समाजावर प्रभाव पडत असतो हे विचारात घेता साहित्याला एक सामाजिक परिमाण प्राप्त होत असते त्यामुळे तिथे कलात्मकते बरोबर सामाजिकतेचा ही विचार महत्वाचा ठरतो.

यावरुन लक्षात येईल की साहित्य निर्मिती,केवळ यांत्रिक निर्मिति नाही तर न कळत त्याच्या कलाकृतीतून तत्कालीन समाज मनाचे प्रतिबिंब उमटत असते त्यामुळे ` साहित्य व समाज यातील परस्परसंबंध आडवळणी व जटिल असला तरी साहित्याला काही प्रमाणात तरी जीवनाचा आधार असतो हे मान्य व्हायला हरकत नसावी ` [१]

प्रत्येक समाजाची धारणा, त्यामागील रचना तत्वे, वेगळी असतात. धर्म कल्पना रुढी,तत्वप्रणाली,आचार विचार दृष्टीकोन संकेत शिष्टाचार नीती कल्पना इत्यादी विशेषा सतत वेगळे असतात. त्या सर्वांच्या स्तरांत त्या त्या समाजाची जीवनपध्दती निश्चित होत असते पण तीही सरसकट एका साच्याची असते असे नाही.आनंदीबाई शिर्के यांच्या ` सांजवात ` मधील सामाजिक जीवनाचे चित्रण विचारात घेत असताना वरील विचार लक्षात घेऊनच करावा लागेल. १९व्या शतकातील सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब आनंदीबाईंच्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

आत्मचरित्रातून त्यांच्या जीवनाच्या अनुषंगानी व त्यांच्या जीवनातील घटनांच्या सहाय्याने त्यानी नेमकेपणानी, तटस्थवृत्तीने व अलिप्तपणाने रेखाटलेले आहे. त्यांचे जीवन आणि समाज त्या समस्या त्यांच्या जीवनानुभूतीत एकरुप झालेल्या दिसतात. प्रथमत: त्यानी साठ सत्तर वर्षापूर्वीच्या मराठा समाज त्यांच्यातील हेवेदावे, त्या समाजाचे पूर्वग्रह त्यांचा खुजेपणा त्या समाजातील लहान-मोठ्या कुटुंबातील एकोपा, भांडणे, सहयोग आणि संघर्ष[२] कसा होता ? हे या आत्मचरित्रातून आपल्या दृष्टीस पडते. त्या काळात देशस्थ आणि कोकणस्थ मराठा समाज यांच्यात वैमनस्य होते. विशेषत: आनंदीबाईनी त्याची जाणीव आपल्या विवाहाच्या प्रसंगाच्या निमित्ताने निर्माण झालेल्या संघर्षातून रेखाटली आहे. काजवेकर, अंतरवळीकर वडसतेकर, मळेकर शिर्के वगैरे खोपडकर शिर्क्यांच्या घराण्याशी लग्नाने संलग्न झाले. खोपड, डोरनण वडसत्वे सात आठ गांवे शिर्क्यांची त्यात खोपडगांव आमचे ( आनंदीबाई शिर्के यांचे ) रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील गरीबातल्या व्यक्तिसही आपले शिर्के घराणे हे फार शुध्द व श्रेष्ठ आहे असा अभिमान होता. घराण्याची शुध्दता कायम राखण्यासाठी बहुतेकांनी आपली एक मुलगी बहिणीच्या मुलाला द्यायची हा अलिखित नियम करुन टाकलेला होता. हा सर्व घराण्याबद्दलचा विचार ` सांजवात ' मधील पृष्ठ क्रमांक १३७ ।१३८ पानांवर आलेला आहे. हे कोकणातील खानदानी घराणे तर शिंदे हे देशस्थ घराणे कोकणातल्या उच्चभ्रू मराठ्यांना हा संबंध पसंत नव्हता, या संदर्भात ही निर्मिती कशी झाली हे ` सांजवात ' च्या प्रस्तावनेत वि.द.घाटे यानी पृ.क्र.१० वर मांडलेला आहे. त्याचा विस्ताराने उल्लेख केला आहे. कोकण एका बाजूनी समुद्र दुसऱ्या बाजूनी सह्याद्री यांच्या कात्रीत सापडलेला, सह्याद्रीमधून निघालेले फाटे सर्व कोकणभर पसरलेले अशा या फाटकांच्या बेचक्यात पूर्वी धाडसी मराठा पुढाऱ्यांनी झाडी कापून ती जमीन लागवडीखाली आणली. आणि एकाच रक्ताच्या कुटुंबाची स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण अशी वसाहत ठिकठिकाणी स्थापन झाली. ७ गांवे शिर्क्यांची ५ गांवे महाडीकांची, १० गावे शिंदे यांची खाली दक्षिणेस असिज, साळवी, सावंताची गांवे, शिर्के महाडीका खेरीज दुसऱ्याशी संबंध ठेवित नसत. प्रत्येक पिढीत वधू महाडीकाकडून यायची.

आणि मामाच सासरा व्हायचा अशा या बंदिस्त जीवनामुळे त्याची मने टणक झाली. निष्ठा धार धार झाल्या.तरी पण मने संकुचित आणि आकसलेली झाली कुंपणा पलीकडचे जग या मराठ्यांना फारसे दिसत नव्हते. दिसले ते पटत नव्हते अशा या समाजात आनंदीबाईंच्या पतीचा म्हणजे शिवराम शिर्केचा जन्म झाला. त्यानी एका देशस्थ मराठा मुलीशी म्हणजे आनंदीबाईशी विवाह केला. मात्र शिवरामपंताच्या मनात कोणताच आकस नव्हता.एक प्रेमाचा धागा होता.पण त्या विवाहाने या दोन्ही समाजात वितुष्ट निर्माण झाले. `कोकणी समाज सापाप्रमाणे चवताळून उठला,खणकला, वादळ झाले.सभा झाल्या. शिर्के पती पत्नीस वाळीत टाकण्याचे प्रयत्न झाले प्रत्यक्ष विवाहाच्या वेळी सुध्दा पोलीसांना बोलाविणेत आले परंतु आनंदीबाईंच्या विवाहात शिवरामपंत आणि आनंदीबाई यांच्या प्रेमळ स्वभावामुळेच सहनशीलते-मुळेच या दोन्ही समाजातला विरोध सहन करुनही आपला जीवन गाडा सुरळीत-पणानी हाकला.या विवाह प्रसंगातून तत्कालीन कोकण आणि देशस्थ मराठा समाजातील विरोधाभासाचे नेमके चित्रण आनंदीबाईनी रेखाटले आहे.अशात-हेचा समन्वयवादी दृष्टीकोनाचा विचार ज्या स्त्रियांच्या मनातून व्यक्त झाला अशा `आनंदीबाईंच्या चरित्रांची महाराष्ट्राला आणि विशेषत: मराठा समाजाला फार गरज आहे`[3] असे वि.द.घाटे यांना वाटते. पण भालचंद्र फडके यांनी या संदर्भात वि.द.घाटे च्या विधानाला थोडासा विरोध दर्शविला आहे.कारण मराठा समाजाची गरज भागविण्यासाठी हे चरित्र अवतरलेले नाही`[4] असे भालचंद्र फडके म्हणतात.परंतु तत्कालीन मराठा समाजाची एकंदर परिस्थिती काय होती ? हे जसे स्पष्ट होते तसेच आत्मचरित्र प्रबोधन कालखंडाच्या युगातील असल्यामुळे कलावंत कलेची निर्मिती करीत असताना स्वत:च्या जीवनानुभूतीचे दर्शन घडवून देत असताना न कळत तात्विकतेचा ,बोधाचाही विचार मांडून जातो. त्यामुळे वि.द. घाटे यांना समाज मनाच्या ऐक्याच्या दृष्टीनी तसे विधान करावे असे वाटले असावे.

विवाह --

विवाह ही एक समाजाची गरज आहे. लोकहितवादींचे विचार धन समजावून सांगताना पु.ग. सहस्त्रबुध्दे म्हणतात "लग्न हा धर्माचा नियम नसून ती एक रीत आहे" ५

तर "स्त्रीजीवनाची नव क्षितिजे" प्रस्तावनाकार न. वि. गाडगीळ विवाह संबंध आपले विचार मांडतात "विवाह ही एक केवळ व्यक्तिगत बाब नाही तिला एक सामाजिक पार्श्वभूमी असते आणि ती हेतू म्हणजे समाज चालविणाऱ्यांचा असतो म्हणून स्त्री आणि पुरुष हे प्रवृत्तीनुसार एकत्र येतात. त्यांचा एकत्र येण्याचा सामाजिक हेतू योग्य तऱ्हेने म्हणून समाज कांही नियमन, कांही नियंत्रण करीत असतो आणि हे नियमन व नियंत्रण काही कायद्याने होते काही सामाजिक संकेताने व काही व्यक्तिगत संयमाने या कारणास्तव विवाहाची समाजाला गरज असल्याचे कळते. लग्नाच्या विचित्र पध्दती त्या काळात रुढ होत्या. बाल जरठ विवाह, ५० वर्षाचा मुलगा व दहा वर्षाची मुलगी किंवा १२ वर्षाची ( आनंदीबाई शिर्के यांचा एक अनुभव ) "सतरा अठरा वर्षाची मुलगी व तिचा नवरा एखादा दहा वर्षाचा पोर होता ती त्याला पाहून लाज काढायची म्हणजे तोंडावर पदर ओढून तोंड झाकायची हे विजोड जोडपे म्हणजे पोटात असताना ठरलेल्या लग्नाचा परिणाम होता. मुलगे किंवा दोन्ही मुलीच जन्माला आल्या तर दुसरे भिन्न लिंगी मूल जन्माला येईपर्यन्त थांबायचे व मग त्या विजोड जोडप्याची सांगड घालायची अशी प्रथा होती" ( सांजवात पृ.१९ ) आपण दिलेला शब्द पाळायचा, एखाद्या घराण्याशी आपला संबंध कायम ठेवायचा, या इच्छेमुळे अशा विवाहाची प्रथा पडली असावी.

पाटीदार लोकात यावेळी बाल विवाह तर प्रचलित होताच पण मूल पोटात असतानाही लग्न ठरत असे.

विवाहाच्या संदर्भात आनंदीबाई स्वत:च्या विवाह प्रकरणांच्या अनुषंगाने समाजातल्या रुढीबद्दल विचार मांडतात व त्यातून हुंड्या सारखी चाल योग्य कशी नाही हे त्या दाखवून देण्याचा प्रयत्न करतात. हुंडा पध्दतीमुळेच कितीतरी गरीब मुलींची जीवने उध्वस्त झाली आहेत. त्याच प्रमाणे देशस्थ मराठा आणि कोकणस्थ मराठा असा वैवाहीक जीवनाच्या दृष्टीने विरोधाभास निर्माण न करता त्या दोन मनाचे मिलन विचारात घेणे किती आवश्यक आहे याचाही विचार सूक्ष्मपणे आनंदीबाईंनी मांडलेला आहे. त्या स्वत:च पृ.क्र.११२ वर म्हणतात " मी मराठ्यांची मुलगी नाही काय ? देशस्थ असले म्हणून काय झाले ? मी काही पुनर्विवाह रुढ दंपतीची मुलगी तर नाही मग बिचकण्या सारख माझ्यात काय आहे ? हे लोक कशाला रुजतात ? अशी कोणती गोष्ट माझ्यात वाईट आहे की ज्यामुळे लोकानी बिथरावं आणि जातप्रकरण म्हणजे तरी काय ? " मी देशस्थ असल्याने माहीत असताही शिर्क्यांनी ते मनावर घेतले नव्हते " या उलट या पलीकडच्या किती तरी सुधारणा समाजात व्हायला पाहिजेत, असे अधून मधून शिर्के प्रगट करीत असत पण आनंदीबाईंना असा प्रश्न निर्माण होईल शिर्के सारख्या सुधारणावादी विचारवंताला आपली मते स्वत:च्या वडिलांना पटवून देता येत नव्हती काय ? उलट आनंदीबाई हे ही स्पष्ट करतात " प्रत्येक सुधारणावादी तरुणाला रुढीशी टक्कर देताना आप्तस्कीयाशी झगडावे लागते हे मला वाचून व ऐकून माहित झाले होते " ( सांजवात पृ.११३ ) शिर्क्यांच्या संस्कारवादी वृत्तीमुळे परंपरागत रुढीवर मात करणे मनात असूनही जमत नव्हते, आनंदीबाईंनी सामाजिक विरोधाला न जुमानता शिवराम शिर्के यांच्याशी लग्न केले हे धाडस तत्कालीन समाजात धाडसाचे वाटते तो प्रेम विवाह होता. विवाहाच्या संदर्भात आनंदीबाई जाता जाता असाही विचार व्यक्त करताना म्हणतात " मोठ्या वयात ज्यांची लग्ने होतात त्यांच्या आवडी निवडी, मने, स्वभाव जरा निश्चितच झालेल्या असतात. लहान वयात मुलामुलींची मने जशी कोवळी, क्वचिक असतात न कुरकुरता वळतात, वाकतात तशी प्रौढ मुलामुलींची बिनतक्रार वाकत नाहीत. सुदैवाने समंजस सारथी लाभला तर गाडा वळणावर येऊन न कुरकुरता चालतो

नाही तर ? ( सांजवात पृ.३३२ )

हुंडा पध्दत --

आनंदीबाई यांना हुंडा पध्दतीबद्दल सुध्दा वैचारिक दृष्टीकोन मांडावयाचा आहे. स्वत:च्या जीवनानुभूतीच्या अनुषंगानी सामाजिक विचारावर त्या प्रकाश टाकू पहातात.लहानपणापासून हुंडा पध्दतीबद्दल त्या नाराजी व्यक्त करीत` हुंडा न देण्याच माझं हे मन अगदी लहानपणापासून आहे त्याला मी चिकटून आहे आणि पुढं ही राहिल` ( सांजवात पृ.११५) असे त्या स्वत:च म्हणतात` एखाद्या वेळेला बाबा एकत असते तर गोष्ट वेगळी` त्यांचा स्वभाव,मुळात साध्या राहणीचा व उदात्त विचारसरणीचा होता. त्या म्हणत` मला दागिने नकोत,भारी किंमतीचे कपडे नकोत आणि तुम्हा सर्वांचा हुंडयाचा हट्ट असेल तर ते लग्न ही नको ( सांजवात पृ.११५ ) परिस्थिती आणि हुंडा अशा संघर्षामुळे कित्येक मुलींचे संसार उध्वस्त होऊ शकतात हा विचार आनंदीबाईनी आपल्या आत्मचरित्रात मांडून आजच्या ही काळाला तो किती योग्य आहे हे जाणवून दिले आहे. पैसा देऊन लग्न करणं हा विचार त्यांच्या मनाला असहाय्य होतो. या साठी आपल्या बाबांना त्या पत्रात म्हणतात` कोणत्याही रुपाने वरपक्षाला पैसे देऊन मला लग्न करावयाचे नाही. हुंडा न घेता लग्न झाले तर मला आनंदच आहे. तसे न झाले तर सर्वात अधिक दु:ख मला होईल ते मी सोशीन पण पैसे देऊन लग्न झाले तर मला मरण प्राय: दु:ख होईल म्हणून माझ्यासाठी कोणालाही कोणत्याही सबबीवर पैसे देऊ नका. सोन्याची सुरी झाली तरी उरात खुपसून घ्यायची नसते, शिर्के किती ही चांगले असले तरी तुमच्या जिवाजड हे लग्न मला कर्तव्य नाही.` ( सांजवात पृ.११४ )

हुंडा न मागणाऱ्यांशी लग्न न करण्याचा आनंदीबाईंनी निश्चय केला होता. अर्थात वर उल्लेख केल्याप्रमाणे तो लहानपणापासून त्यांच्या अंतर्मनावर ठसलेला होता. त्यामुळे मुलींचा जन्म नकोरे बाबा असे म्हणण्यापर्यन्तचा विचार स्त्री मनात येतो.

विधवा समस्या --
-----------

विधवेला आपलं जीवन जगणं सामाजिक दृष्टया किती नैराश्यजनक असावयाचं या बाबत सांजवात मधून त्या विचार मांडतात मी पुष्कळ विधवा बायका पाहिल्या होत्या. त्या पैकी गुजराथी असत त्यांच्या वेशभूषेत आमूलाग्र बदल झालेला असे शिरोभूषणांना मुकल्यामुळे सांजशृंगार तर सोडाच पण लाल काळ्या आळवणात तोंड झाकून सकाळ संध्याकाळ मोठमोठे हेल काढून त्याना वर्षभर नेमाने रडत बसावे लागे आमच्या स्त्रियांचे हाल तर पुसून नयेत कोपऱ्यातला केर आणि त्या सारख्याच लेखल्या जात ( सांजवात - पृ.१८९ )

स्त्री मन व स्त्री शिक्षण विचार --
-------------------------

आनंदीबाईंनी स्त्री मनाचा केलेला विचार हा देखिल त्यांच्या जीवनाच्या अनुषंगानी साकार झालेला आहे. मुलगी म्हटले की प्रत्येक बाबाच्या मनात एक भव्य प्रश्न चिन्ह निर्माण होते कारण मुली जास्त असल्याकी शिक्षणाप्रमाणेच त्यांच्या लग्नाच्या बाबतीतही त्यांच्या पुढे प्रश्न निर्माण होतात त्या म्हणतात आम्ही मुली. आमच्यामुळे बाबांना त्रास.आमच्यावर काहीच परिणाम न व्हायला आम्ही भावनाशून्य निर्जिव बाहुल्या नव्हतो, जमिनीवर पडलेले क्षुद्र शेण सुध्दा माती घेऊन उठते मग आम्ही ? माझ्या मनात पहिला विचार आला तो हा की आम्ही मुली जन्माला का आलो ? ( सांजवात - पृ.७० )

परत त्या अशी ही कल्पना करतात देवाने मला मुलींच्या जन्मास घातल्या बद्दल दोष्ा ही देई आणि करुणा ही भाकी. खरेच जर मुलगा असते तर मुलगी म्हणून या ना त्या कारणाने माझ्या शिक्षणाची हेळसाड झाली नसती एव्हाना घराला मदत करण्याच्या मार्गावर मी निश्चित असते ( सांजवात पृ. ६३) अशा तऱ्हेचा विचार परत पृ.क्र. ७० वर आलेला आहे. मुलांच्या जन्माला आलो असतो तर आई बापाचे पांग फेडले असते काय ? आलो स्त्री जन्माला त्या आलो पण आमचे जन्मणे आणि जगणे तर असे भारभूत, व्हायचे होते तर देवाने आम्हाला जन्माला का घातले आता आम्ही करावे तरी काय ? कशाने आई - बापाचे संकट दूर करावे या ठिकाणी आनंदीबाई मुलींच्या बाबतचा विचार मांडत असताना मुलींचा जन्म हा किती गहन प्रश्न आहे .या विचारावर त्या नेमका प्रकाश टाकतात. मात्र हा तात्वीक विचार आपली जीवनकथा कलावंताच्या भुमिकेतूनच उकलत असताना आलेला हा विचार आहे. हे लक्षात घेणे आवश्यक ठरते. आत्मचरित्र हा ललित प्रकाराकडे झुकलेला ललितेतर प्रकार आहे यात अभिव्यक्तिला अधिक महत्व दिले गेले आहे. त्या भावनाभिव्यक्ती बरोबरच कलाकृतीतून तत्कालीन सामाजिक विचारांनाही चालना मिळते. त्या काळात मुलींनी नोकरी करणं, मुलींनी शिकणं, हे अधिकच गौण मानले जाई. आनंदीबाईच्या वडिलांच्या उद्गारातून मी मुलींची कमाई खायला मी काय नामर्द आहे काय ? ( सांजवात - पृ. ६३ ) या उद्गारातून स्पष्ट होते . मुली वाढल्याने आई बापाना अनेक गोष्टीशी सामना करावा लागतो.

आपण आपले चांगले वागायचे, ब्र उच्चारायचा नाही तेव्हढे हाती होते हा सहनशीलतेचा उच्चतम भाग होता. असे असले तरी त्या काळात स्त्रीमनाचा व न कळत उमलणाऱ्या फुला सारखा विचार असला किंवा तत्कालीन परिस्थितीतील हे स्त्री मनाचे फूल पूर्ण उमलू शकले नसले तरी श्रीमंत महाराज साहेबांनी आपल्या राज्यात मुला-मुलींचे प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले होते, तशीच प्रौढ शिक्षणाचीही सोय केली होती ( सांजवात - पृ. ५३ )

अशा प्रयत्नामुळे स्त्री शिक्षणाला, स्त्री मनाला तिच्या वैचारिकतेला,. भावना व्यक्त करणाऱ्याला स्वतंत्रपणे चालना मिळाली. आणि तेच कोमजलेले फूल परत वैचारिकतेच्या शिडकाव्यामुळे उमलू लागले.

स्त्रियांना शिकण्यासाठी स्वतंत्र वेळ दिली जात असे पडदा लावलेला स्वतंत्र वर्ग असे. शिकवण्यासाठी बाई असत आम्ही मुली असल्याने सारे विषय शिकत होतो शाळेची वेळ बारा नंतर असे मुलींच्या शिक्षणावर त्याकाळात विशेष लक्ष दिले जात होते. श्रीमंत महाराजांचे शिक्षणाकडे फार लक्ष असे. मुलींना शिक्षण मिळण्यासाठी ते फार प्रयत्न करीत प्रारंभी शाळेत राज - घराण्यातील मुली होत्या पण त्यांच्या सहवासाने आनंदीबाईंना मोठ्या लोकांच्या मोठ्या गोष्टीचे ज्ञान होऊ लागले. पण त्याच बरोबर त्या काळात हिंदू मुलींच्या मनावर ख्रिस्ती धर्माचा ठसा उमटला जाऊ नये याची काळजी घेतली जात असे ही बाटगीबाई कशाला ? आपल्या मुलींच्या शिक्षणावर हिंदू बाई असावी ( सांजवात - पृ. ३१ ) हा श्रीमंत महाराजांचा विचार तत्कालीन राजकीय परिस्थितीतही प्रकाश टाकणारी आहे. विशेषत: भरतकाम, जरी - काम यांचे शिक्षण दिले जात असे अशा स्त्रीशिक्षणाच्या संस्कारामुळेच आपल्यात वैचारिक बदल होऊ शकला हे आनंदीबाई आवर्जून सांगतात. आणि आजच्या काळात मुलींना मिळत असलेल्या शिक्षणाबद्दल कौतुक करतात. अभिमानाचे उद्‌गार काढतात. कारण त्या काळात मराठा स्त्री समाज म्हणावा तितका प्रगत झालेला नव्हता. महात्मा जोतीराव फुले, आगरकर, भांडारकर, लोकहितवादी, रानडे वगैरे सारख्या सुधारकांनी स्त्रीला पराकोटीच्या परस्वाधीनतेतूनच बाहेर काढण्यासाठी त्यानी प्रामुख्याने स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला. त्यामुळे आनंदीबाईंना त्यांच्या जीवनात या सुधारक वृत्तीमुळे शिक्षण घेता आले. आपले व्यक्तिमत्व घडविण्यास त्याना या घरातल्या संस्काराबरोबरच शिक्षणाचाही फार उपयोग झाला म्हणून आनंदीबाई म्हणतात हल्ली मन पालटला आहे मुलीला ध्येयपूर्वक शिकवितात. मुली ही मन लावून शिकतात हे किती स्वागतार्ह व भाग्याचे आहे आमच्या वेळी मराठ्यात ते नव्हते ( सांजवात - पृ. ८९ )

समाजातील दारिद्र्य --

आनंदीबाई आपल्या आत्मचरित्रात तत्कालीन समाजातील दारिद्र्यावरही नेमका प्रकाश टाकतात. १९५६ साली गुजराथमध्ये दुष्काळ पडला. टोळधाड आली त्याला ` छपन्याचा दुष्काळ ` म्हणत ( सांजवात - पृ. ३४ ) . त्यामुळे गरिबगुरिबांची अन्नान्नदशा झाली सर्वत्र भूकभूक हा आकांत सुरु झाला. गुरे वासरे व मुले ही कोरभर भाकरीसाठी विकू लागली. गाय पाच आण्यात विकली जाऊ लागली ` ( सांजवात - पृ. ३४ ) ही परिस्थिती लक्षात घेऊन सरकारने गल्लोगल्ली तोंडाशी माणसे बसवून गव्हाची रोटी व बेसन माणसाना देण्याची व्यवस्था केली होती लोक ` वालाच्या साली वेचून खात होते ` ( सांजवात - पृ. ३५ ) गरीबांच्या मातीच्या कणात धान्य कण शोधण्याचा प्रयत्न होता . आनंदीबाई अशा करुण परिस्थितीचे वर्णन करीत असताना न कळत एक विनोदाचा मामला सांगून जातात त्या म्हणतात ` आम्ही लोकांच्या समोर गहू मूठभर फेकू लागलो. माणसे कोंबडया-प्रमाणे ते टिपू, खाऊ लागली. ` ( सांजवात -- पृ. ३५ ) खरे पाहता हा एक क्रूर खेळ होता पण त्या आमच्या बाल मनाला त्याची थट्टा उमगली नाही. आईने आम्हाला थांबवले यावरुन समाजातील दारिद्र्य किती कळसाला पोहचले होते हेच या लेखिकेला जाणवून द्यावयाचे आहे. याचा परिणाम म्हणजे ` पुष्कळ मराठे सरदार दरखदारांनी लोकांच्या जवळून पाचसात वर्षांच्या मुली विकत घेऊन जमवल्या. त्यांना कामे शिकविली याच मुलीतून दासी दिल्या ` ( सांजवात -- पृ. ३५ ) याचे कारण म्हणजे याच मुली घरकामामध्ये चांगल्या ठरत. महाराष्ट्रीयन माणसांची सांपत्तिक स्थिती आधी बेताची हाता तोंडाशी गाठ म्हटले तरी चालेल ` ( सांजवात - पृ. ३५ ) त्यामुळे अशा गरीब कुटुंबाची आबाळ होत होती. हे आनंदीबाई स्वत:च्या जीवन गाथे बरोबरच समाजातल्या गरीबांची करुण गाथा ही तितक्याच उत्कट शब्दांतून वर्णन करतात.

औषधातील त्रुटी --

आजच्या सारखी औषध व्यवस्था त्या काळात प्रगत अवस्थेला पोहचलेली नव्हती. त्या संदर्भात आनंदीबाई म्हणतात ` त्या काळात पेटंट औषधे निघाली नव्हती रोग्याला बरा करण्यासाठी आपले ज्ञान डॉ. खर्ची घालीत रोग निदान व उपचार कसोशिने करीत ` ( सांजवात - पृ. ५५ ) औषधाच्या त्रुटी बरोबरच आनंदीबाई त्या काळातील डॉक्टरांच्या वागणुकीतीलही प्रामाणिकपणावर प्रकाश टाकतात.

प्रवास --

प्रवासाच्या बाबतीत ही आनंदीबाई जाता जाता नेमका आणि योग्य विचार करताना दिसतात त्या काळांतील प्रवास आजच्या सारखा धोक्याचा नव्हता ते स्पष्ट करताना त्या म्हणतात ` त्या वेळचा प्रवास बायका मुलींना आता सारखा धोक्याचा नव्हता. मार्ग, गाडी,वेळ विचारली तर कुणी ही धोका न देता मार्गदर्शन करीत असे. ( सांजवात - पृ. ५६ )

उद्योग --

आनंदीबाई आपल्या आत्मचरित्रातून ` स्व ` जीवन कथे बरोबरच तत्कालीन समाजातील उद्योगाबाबत ही त्या लिहितात . मात्र आनंदीबाईंनी स्त्रियांच्या उद्योगाबाबत अधिक विचार केला आहे. भरत काम, शिवणकाम यावर भर होता.` त्या काळात भरत कामाचा खपही खूप होता मखमलीपट्टीवर रेशमाने झाणिने किंवा स्पं करून काही पैसा उपजिविकेसाठी मिळविणे (सांजवात- पृ. ७८ ) ` आजच्या सारखे त्या काळात काजे करण्याचे मशीन नव्हते. काजे, बटने करणे हा एक लघु उद्योग त्याना मोठ्या प्रमाणात मिळे ( सांजवात - पृ. ७८) त्या काळात` चोळीची शिलाई अवघी चार पैसे पण आम्ही ते ही करीत होतो. वडिलांना, मावांना न समजता` ( सांजवात - पृ. ७८ ) आजच्या

काळाच्या दृष्टीने शिलाई खूपच स्वस्त असे. पण त्या काळात पोट भरण्यास ती निश्चितच जास्त होती हे आनंदीबाईंना प्रकर्षाने मांडावयाचे आहे. त्याचप्रमाणे कोकणस्थ मराठ्यांच्या स्त्रिया गिरणीत कामाला जात.देशस्थ बायका सहसा गिरणीत जात नसत. पोक्तस्त्रिया विड्या वळायला दुकानात जात. काही शेतात,मळ्यात भाजी काढायला जात किंवा रोज लागणाऱ्या वस्तूचे ' पान विडीचे किंवा भाजीपाल्याचे दुकान चालवित. कोकणी स्त्रिया गृहउद्योग करीत असत व खानावळी चालवित' ( सांजवात - पृ.७८ ) ' कोकणी लोक शिकले सवरले तरी खानावळी केल्याशिवाय राह्यचे नाहीत' ( सांजवात - पृ.७८) काही स्त्री वर्गाचा समज परक्या पुरुषांचं उष्ट खरकटं कुणी काढावं ' असाही होता या वरून साधारणत: ह्या स्त्रियांचे जीवन किती कष्टाचे होते. आजच्या सारखी मुक्तता,मोकळेपणा स्त्री वर्गाला नव्हता. हेच या लेखिकेला जाणवून द्यावयाचे असावे. सुधारणाबद्दल अनेक गोष्टी बाबत लिहित असताना सुधारणांच्या बाबतीत ही काही वेळा परखडपणानी आनंदीबाई विचार मांडतात ' हे सुधारक असेच दुसऱ्यांच्या घरावर तुळशी पत्र ठेवणार' ( सांजवात - पृ.६९ ) आनंदीबाईंनी स्त्रियांची सुधारणा करणार की होऊन देणार ? हा निबंध वाचला. तत्कालीन सुधारणा बाबत लिहितात. त्यांच्या जीवनातील प्रसंगाचा एक आधार आनंदीबाई देतात' बाई तुम्हाला पाणी चालायचं नाही ? का ? आम्ही आहोत ,हरकत नाही, तुम्ही पाणी घ्या' आनंदीबाई म्हणतात घ्यायला चालेल असे म्हणून' ओंजळीने मी पाणी प्याले हे प्याले नाहीत. वडिलांना कळाले तर काय म्हणतील ? आमच्या गांवी कोकणात महारांची सावली सुध्दा पडू देत नाही संस्कार एकदम कसे बदलतील' ( सांजवात - पृ.१३७ ) त्या दृष्टीनेच आनंदीबाईंना मुंबईतील लोकांच्या पेक्षा पुण्यांतील लोकांचे सुधारणावादाचे विचार अधिक प्रगत वाटतात. व त्याना पुण्यात असताना त्याचा अधिक उपयोग ही त्याना झाला या ठिकाणी आनंदीबाईंच्या स्वभावातील परिवर्तनशील मनाचा प्रत्यय येतो. जुन्या विचारानी ग्रस्त झालेल्या स्त्री मनापासून मुक्त मनाच्या प्रवासाकडे

निघालेल्या हे स्त्रिमनाचे दर्शन त्यांच्याच जीवनांतील प्रसंगाच्या माध्यमातून घडते. त्याच प्रमाणे आनंदीबाई तत्कालीन जात-पातीचाही विचार जाता जाता करतात त्या काळात ' सदाशिव पेठेत ब्राह्मणेत्तरांना जागा मिळणे मग कायस्थ का असेना त्या काळी कठीण होते ' ( सांजवात - पृ.१८४ )
या ठिकाणी आनंदीबाईच्या मनाची संकुचित वातावरणात होणारी घालमेल जशी दिसते त्याप्रमाणे त्यांच्या प्रगल्भ विचारांच्या जाणीवेचीही कक्षा लक्षात येते. त्यांच्या सुधारणावादी मनावर महर्षि वि.रा. शिंदे यांच्या सहवासाचा व विचारांचा परिणाम झालेला आढळतो. त्या काळात आजच्या इतका मराठी स्त्री समाज प्रगत झाला नव्हता.

धार्मिक जीवन --

आनंदीबाई तत्कालीन धार्मिक परिस्थितीवर ही प्रकाश टाकतात. मुलामुलींची मने संस्कारक्षम असतात ती तुलनात्मक विचार करतील या गोष्टीची त्यांच्या मनाला दखल नसावी आपण जसे हरि विठ्ठल म्हणताना डोळे मिटून हात जोडतो तसे आपल्या मुलांनी करावे असे त्यांना वाटत असावे ( सांजवात - पृ.५० ) आनंदीबाईंनी हरितालीका ' या धार्मिक गोष्टी बाबत आपले विचार मांडले आहेत. गुजराथी समाजात आनंदीबाईचे अधिक वास्तव्य असल्यामुळे त्यांच्या काही धार्मिक पध्दतीचे त्या अधिक वर्णन करतात ' आमच्या घरात ' रुकमिणी स्वयंवर ', ' सीता स्वयंवर ' अशी पुस्तके वाचून घेतली जात. त्याच प्रमाणे ' ऊखा चित्र दर्शन ' किंवा ' ऊखाहरण ' ( गुजराथी पोथी ) गुजराथीतील ' ओकाहरण ' म्हणत वाचन होई त्याच प्रमाणे तत्कालीन व्रताचरणावर प्रकाश टाकताना आनंदीबाई गुर्जर मुली चैत्रात ' अलुणाव्रत ' करीत अलुणा म्हणजे आळणी, पांढरे अन्न म्हणजे भात दही, दूध खायचे पण मीठ खायचे नाही. आम्हालाही त्या व्रताची दीक्षा दिली होती ' ( सांजवात - पृ.४८ ) या वरून त्या काळातील श्रध्दाशील

स्त्रीमनाचा आनंदीबाई विचार करतात. त्यांच्या सहवासामुळे आमच्या ही घरी अशा काही धार्मिक श्रध्दा रुजल्या गेल्या . त्याच प्रमाणे गुजराथी स्त्रियांना मी ध्रुवाख्यान" थाळे कुंवर बाईंना मामेरु ही गाणी शेजारच्या बायकाना शिकविली. शिवाय " मी ही बेलांचा, फुलांचा, दुर्वांचा लक्ष वाहू लागले. देव दर्शनाला जाणे, जाताना त्यात तूप साखर मिसळून बरोबर नेणे आणि मुंग्यांच्या वारुळात पेरणे , चिमण्या साळुंक्या आदी पक्षासाठी दाणे व पाणी भरुन अंगणात ठेवणे, इत्यादी गोष्टी एखाद्या आश्रमवासी कन्यके - प्रमाणे करु लागले. कार्तिक स्नान, माघ स्नान सुध्दा" यावरुन तत्कालीन स्त्रियांच्या धार्मिक , श्रध्दाशीलतेबाबत आनंदीबाई आपल्याच अनुभवांच्या माध्यमातून प्रकाश टाकतात. " गायकवाडी अन ब्रिटिश हद्दीच्या मध्ये दुधिया तलावाच्या काठी हे देवीचे देऊळ आहे. देवी समोर छोटेसे मारुतीचे देऊळ. हिन्दू पारशी लोकही देवीला नवस. कोंबड्या वाहत. एक बोकड आणि मेंढाही देवीला सोडलेला होता. ( सांजवात - पृ. ४७ ) यावरुन धार्मिक समजूतीबाबत ही आनंदीबाई विचार करताना दिसतात.

बैल आंत नेताना समोरुन गाय किंवा डोक्यावर भरली दूध घेतलेली सवाष्ण अथवा कुवारीण असे कुणी तरी यायला हवे असे. सहजगत्या असे कुणी तरी शकुनाचे सामोरे आले तर फारच उत्तम न पेक्षा एखाद्या बाईला किंवा मुलीला समोरुन यायला लावीत पुष्कळदा मला ही समोरुन यायला लावीत. मात्र ह्या शकून देणाऱ्या बाईमुलीने डोळ्यात काजळ घातलेले चालत नसे. काजळ घातले तर पीक काळे येईल असे ते मानीत" ( सांजवात - पृ. १९ ) कर्मकांडाला प्राधान्य होते. काही झाले तरी देवाकडे धावायचे अशी लोकांची श्रध्दा होती" ( सांजवात - पृ. ३० ) यावरुन प्रयत्नवादापेक्षा ईश्वरवादाचे समाजात अधिक प्राबल्य असल्याचे दिसते . अंधश्रध्दा बरीच होती हे आनंदीबाईंना जाणवून द्यावयाचे आहे.

प्रथा --

तत्कालीन समाजातील काही प्रथांच्यावर आनंदीबाई आपल्या आत्मचरित्रातून नेमका प्रकाश टाकतात. मृत्यूच्या प्रसंगाचे चित्रण ही आनंदीबाई तितक्याच वैशिष्टपूर्ण रितीने करतात. ` गुजराथी लोक कर्तव्य कठोर असतात मरणाऱ्यावर पाणी ओततात. आणि पुरुष मरणोन्मुख झाला की त्याच्या बायकोला भरजरी वस्त्रे नेसवून दागदागिने घालून त्याच्यापुढे आणण्यात मीत नसत` ( सांजवात - पृ. ४७ ) मात्र आता या प्रथा नाहीशा झाल्याचेही आनंदीबाई स्पष्ट करतात. शकुनाबाबतही विचार मांडतात. लेखिका म्हणतात शेतकरी कामाला जाताना` पहिल्या पेरणीच्या वेळी हे शेतकरी लोक शकुन पहात` ( सांजवात - पृ. १९ ) त्याच प्रमाणे घान्याची जपणूक शिस्तबध्द असे जेवतांना गुजराथी पध्दतीच्या थाळ्या असत` जेवतांना शीत सुध्दा सांडता कामा नये. तसेच जेवतांना उजव्या पायाची मांडी घालायची, डावा पाय उभा ठेवायचा, पाण्याचा पेला डावीकडे ठेवायचा, पांच बोटांनी जेवायचे, तोंड वाजवायचे नाही, ढेकर द्यायची नाही. शिंकताना, खोकतांना तोंड बाजूला वळवायचे` ( सांजवात - पृ. २७ ) त्याच प्रमाणे पडदा पध्दतीची प्रथा त्या काळात आढळते.` आमच्या घरी घरसोडीचा पडदा होता. मुंबईला आमच्या मूळ घरी पडदा नव्हता. त्यामुळे आईना पडदा आवडत नव्हता ,बाबांचीही तशी सक्ती नव्हती. तांत्रिक पडदा. आईना पाळावे लागे`( सांजवात - पृ. ५२ ) मात्र या वरुन त्या काळात पडदा पध्दतीची प्रथा होती. हे लेखिका लक्षात आणून देतात. त्याच प्रमाणे` त्या काळात दळणाच्या गिरण्या कुठेच नव्हत्या. घरोघरी सकाळी उठून बायका जाती फिरवित असत. सासुरवाशिणीच्या वाट्यास हे काम हमखास ठरलेले असायचे` ( सांजवात - पृ. ५० ) यावरुन त्या काळात स्त्रियांच्या दळणाबाबतीत प्रथा होती हे लक्षात येते मात्र आपल्या मुलींच्या वाट्यास ते येऊ नये म्हणून काटेकोरपणे बाबा लक्ष घुंडीत होते` ( सांजवात - पृ. ५० ) हे लेखिका प्रकर्षाने जाणवून देते.

A 12224

या सामाजिक प्रकरणांचा एकूण विचार लक्षात घेता ब्रिटिशांच्या आगमनामुळे १९ व्या शतकांच्या सुरवातीला समाजात बरीच विचार जागृती होऊ लागली.लक्षात येते की स्त्रीयां बरोबरच आनंदीबाईंनी तत्कालीन समाजातील चालीरितींच्यावर काही सुधारणा बाबतीत ही नेमका विचार केलेला आहे. आत्मचरित्र हे केवळ व्यक्तिच्या मनाचे प्रतिबिंब नव्हे तर ते समाज मनाचे प्रतिबिंब असते हे स्पष्ट होते त्या दृष्टीने सेमन्सी म्हणतात --

> " An Autobiography is not only a reflection of an Individual mind but also a reflection of the State of Social conciousness "[5]

लहान मुलावरील संस्कार --

त्या काळात लहान मुलांना वागविताना त्यांच्या मनाचा विचार झालेला दिसत नाही. त्यांना फार धाकात वागविले जात असे. मुलांना चांगले वळण लागावे हाच या धाकामागील वडिलमंडळींचा हेतू असावा. परंतु अति - धाकामुळे मुलांच्या मनावर काही विपरित परिणाम होईल हा विचार त्यांच्या मनाला शिवताना दिसत नाही. लहान मुलांच्या अवस्थे संबंधी आनंदीबाई शिर्के ' सांजवात ' मध्ये लिहितात ' मुलांनी खेळावे या गोष्टीला विशेष महत्व नसे. मुलांनी देवा सारखे गुपचूप बसावे अशी अपेक्षा असे. मुलांच्या खोड्या अनिवार झाल्या म्हणजे त्यांना शाळेत डांबीत ' ( सांजवात - पृ. २०९ ) ' शेतकरी जसा चांगलं बी पेरतो तसं मुलांच्या कानावर चांगल्या गोष्टी घालाव्या त्यांना त्या समजतील की नाही हे पाहात बसू नये. योग्य वेळी त्या अंकुरातील लहानपणी ऐकलेल्या गोष्टींची पाळंमुळं माणसाच्या मनात खोलवर रुतून बसतात. म्हणून चांगले तेच मुलांना सांगावे असे बाबा नेहमी म्हणत ' सांजवात - पृ. २० ) सरोजिनी शारंगपाणी आपल्या पत्रात म्हणतात ' आत्मचरित्रे ही त्या त्या काळचा सामाजिक इतिहास असतो. असा इतिहास मनमोकळेपणाने सांगणारी आत्मचरित्रे म्हणजे मानव जातीच्या पाऊल खुणा आहेत '[6] आनंदीबाई ज्या कालखंडात वाढल्या तो काळ प्रबोधन युगाचा दिसतो.

कारण कोणताही लेखक हा स्वत:ची कहाणी सांगत असताना सामाजिक अनुभव सांगण्याचे टाळत नसे आपल्या जीवनाच्या अनुषंगाने समाजाच्या बहुरंगी जीवनाचा परिचय करून देण्यात त्याना विशेष आस्था वाटे.तसे पाहता आनंदीबाई शिर्के यांची प्रवृत्तीही प्रबोधन युगानेच घडविल्यामुळे त्या स्वत:च्या जीवनाकडे अंतर्मुख होऊन पाहताना दिसतात. त्यामुळे स्त्रीसमाजमनाचे प्रतिबिंबही तितकेच मार्मिकपणे त्यांच्या सांजवात मधून उमटताना दिसते.

# संदर्भ

१ प्रा.अरविंद वामन कुलकर्णी — पृ.क्र.१४३
`साहित्य विचार`
प्रतिमा प्रकाशन क्रमांक ९५
१३५९,सदाशिव पेठ,नवा नाका
विजय चौका जवळ ,पुणे ३०
प्र.आ.ऑक्टोबर १९९२.

२ भालचंद्र फडके — पृ.क्र.१६४
```मराठी लेखिका चिंता आणि चिंतन`
श्री विद्या प्रकाशन, २५० शनिवार पेठ,
पुणे ३०
प्रथम आवृत्ती, मार्च १९८०

३ वि.द.घाटे — पृ.क्र.९
`सांजवात` प्रस्तावना
मौज प्रकाशन २१०,
मौज प्रकाशन गृह ,मुंबई
प्रथम आवृत्ती जून १९७२

४ भालचंद्र फडके — पृ.क्र.१६४
`मराठी लेखिका चिंता आणि चिंतन`
- तत्रैव -

५ Biography and Society — p.no.230
Edit.Daniel Bertaux,
Sponsored by the International
Sociological Association -
I.S.A. 1981.
```

६ सरोजिनी शारंगपाणी - पत्र - १-१-७७ पृ.क्र. २७३

'आधुनिक मराठी वाङ्.मयातील स्त्रियांची
आत्मचरित्रे'
एक अभ्यास - डॉ. विमल मालेराव
साहित्य प्रसार केन्द्र सीताबार्डी
नागपूर प्र.आ. २५ मार्च १९८६
परिशिष्ट.